# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 16 January 2025

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १६ जानेवारी २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- भारत ही जगातली प्रमुख सागरी शक्ती म्हणून उदयाला येत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- ७७ वा लष्कर दिन काल सर्वत्र साजरा-संरक्षणमंत्र्यांच्या उपस्थितीत पुण्यात मुख्य संचलन
- अजिंठा-वेरुळ चित्रपट महोत्सवामुळे मराठवाड्यातली तरुणाई सिनेसाक्षर-पद्मपाणि जीवनगौरव पुरस्काराच्या उत्तरात ज्येष्ठ लेखक-दिग्दर्शक सई परांजपे यांचे गौरवोद्गार
- मकोकाअंतर्गत अटकेत असलेल्या वाल्मिक कराड याला बावीस तारखेपर्यंत पोलीस कोठडी

आणि

- राजकोट क्रिकेट सामन्यात आयर्लंडचा ३०४ धावांनी पराभव करत भारतीय महिला संघाचा तीन - शून्यने मालिका विजय

****

भारत जगातली प्रमुख सागरी शक्ती म्हणून उदयाला येत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. मुंबईत काल नौदलातल्या आयएनएस सूरत आणि आयएनएस नीलगिरी या दोन लढाऊ जहाजांचं तसंच आयएनएस वागशीर या लढाऊ पाणबुडीचं जलावतरण पंतप्रधानांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

***“आज भारत पुरे विश्व और खासकर ग्लोबल साऊथ में एक भरोसेमंद और जिम्मेदार साथी के रूप में पहचाना जा रहा है। भारत विस्तारवाद नही, भारत विकासवाद की भावना से काम करता है।***

***भारत ने हमेशा ओपन, सेक्युअर, एन्क्ल्युसिव्ह और प्रॉस्परस इंडो पॅसिफिक रिजन का समर्थन किया है। हमारा एक समृद्ध इतिहास रहा है। अपने इतिहास से प्रेरणा लेते हुये आज का भारत दुनिया की एक मेजर मेरिटाईन पावर बन रहा है।''***

छत्रपती शिवाजी महाराजांनी भारतात नौदलाची सुरुवात केली, त्या शिवरायांच्या भूमीवरून नौदलाला सामर्थ्य दिलं जात असल्याचं समाधान वाटत असल्याची भावना पंतप्रधानांनी यावेळी व्यक्त केली. सागरी क्षेत्रात गेल्या दहा वर्षात बंदर विकास, सीमावर्ती भागांमध्ये वाढता संपर्क, भारतमाला योजना, व्हायब्रंट व्हिलेज कार्यक्रम, अशा योजना राबवण्यात येत असल्याचं पंतप्रधान म्हणाले. आपलं सरकार नौदलासह पूर्ण सैन्यदलाला अधिक सशक्त आणि आत्मनिर्भर करण्याला प्राधान्य देत असल्याचं सांगत, यात महाराष्ट्रातल्या नियोजित वाढवण बंदराचा उल्लेख पंतप्रधानांनी केला.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्यासह नौदलातले अधिकारी आणि कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

दरम्यान, नवी मुंबईत खारघर इथल्या श्री श्री राधा मदनमोहनजी या इस्कॉन मंदिराचं उद्घाटनही काल पंतप्रधानांच्या हस्ते झाला. नऊ एकरांवर वसलेल्या या प्रकल्पात अनेक देवदेवतांची मंदिरे, वैदिक शिक्षणाचे केंद्र, प्रस्तावित वस्तुसंग्रहालय, सभागृह, आणि उपचार केंद्र यांचा समावेश आहे.

****

सशस्त्र दलाच्या अतुलनीय बलिदानाचा सन्मान करण्यासाठी ७७ वा लष्कर दिन काल साजरा झाला. १९४९ मध्ये तत्कालीन जनरल के. एम. करिअप्पा यांनी शेवटच्या ब्रिटीश कमांडर इन चीफकडून भारतीय सैन्याची सूत्रं हातात घेतली होती.

राज्यात लष्कर दिनाचं मुख्य संचलन पुण्यात संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत झालं. यावेळी झालेल्या गौरवगाथा या कार्यक्रमात बोलतांना, लष्कर दिन हा फक्त एका दिवसाचा कार्यक्रम नाही, तर वर्षाचे ३६५ दिवस डोळ्यात तेल घालून देशाचं रक्षण करणाऱ्या लष्कराच्या सैनिकांचा गौरव असल्याचं प्रतिपादन राजनाथसिंह यांनी केलं.

लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी झालेल्या संचलनात लष्कर दलाचे सैनिक, पोलीस दल आणि राष्ट्रीय छात्र सेनेच्या राज्य महिला पथकाचा संचलनात सहभाग होता.

नांदेड जिल्ह्यात बिलोली तालुक्यातल्या सगरोळी इथल्या राजर्षी श्री छत्रपती शाहू सैनिकी विद्यालयात लष्कर दिनानिमित्त हवाई दलातल्या विमानांच्या प्रतिकृती रेडिओ कंट्रोलद्वारे उडवून चित्तथरारक कवायतींचं प्रात्याक्षिक दाखवण्यात आलं. मिग-२१, जॅग्वार, मिराज-२०००, मिग-२९, सुखोई-३०, तेजस आणि रायफल यासह उडता मासा आणि उरी या चित्रपटात रेकी करण्यासाठी वापरण्यात आलेल्या गरुड पक्षाची प्रतिकृतींचा यात समावेश होता.

****

राज्यात काल अन्न आणि औषध प्रशासन विभागाने एकाच दिवशी दूध भेसळ तपासणी मोहीम राबवली. यावेळी विविध ठिकाणाहून दुधाचे १ हजार ६२ दुधाचे नमुने विश्लेषणासाठी ताब्यात घेण्यात आले. यामध्ये विविध ब्रान्डच्या दुधाचे ६८० पाउच तसंच पिशवी पॅकिंग आणि ३८२ सुट्या स्वरूपातील दुधाचा समावेश आहे.

या तपासणी नमुन्यात दोषी आढळणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याच्या सूचना प्रशासनास देण्यात आल्या आहेत अशी माहिती, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली.

****

अजिंठा - वेरुळ चित्रपट महोत्सवानं मराठवाड्यातल्या तरुणाईला सिने साक्षर केल्याचं ज्येष्ठ लेखिका, नाटककार, निर्मात्या सई परांजपे यांनी म्हटलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथं दहाव्या अजिंठा वेरुळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं काल उद्घाटन झालं. एमजीएम विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात झालेल्या या सोहळ्यात यंदाचा पद्मपाणि जीवनगौरव पुरस्कार परांजपे यांना प्रदान करण्यात आला, त्यानंतर त्या बोलत होत्या.

> ***‘‘आजवर मी केलेल्या कामगिरीची उशीरा का होईना पण दखल घेतली, आणि आज मला हा मोठा सुंदर सन्मान मिळवून दिला, त्याचा मी अतिशय आनंदाने आणि नम्रपणे स्वीकार करते. अजिंठा वेरुळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव एका वेगळ्या धारणेनी सुरू झाला. मराठवाड्यामधल्या रसिकांना खास आपला वाटेल, असा हा उत्सव आहे. सांस्कृतिक आणि कलाविषयक उपक्रम केवळ पुण्यामुंबईतच***

***घडू शकतात असं नाही, हे या प्रकल्पानी दाखवून दिलं. मराठवाड्यातल्या तरुणाईला सिनेसाक्षर केलं.''***

सिनेमा हा प्रेक्षकांसाठी असतो, प्रेक्षकांनीही भारतातल्या विविध चित्रपटांची माहिती जाणून घ्यावी, असं आवाहन परांजपे यांनी यावेळी केलं.

दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर, चंद्रकांत कुलकर्णी, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुश कदम, अभिनेत्री सीमा विश्वास, महोत्सवाचे संचालक सुनील सुकथनकर, मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे, यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

भारतीय सिनेसृष्टीचे संस्थापक दादासाहेब फाळके यांनी १०५ वर्षांपूर्वी दिग्दर्शित केलेल्या 'कालिया मर्दन' या प्रसिद्ध मूकपटाचं, या उद्घाटन सोहळ्याआधी विशेष प्रदर्शन करण्यात आलं. येत्या १९ तारखेपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात ६५ राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय चित्रपटांसोबतच तीन माहितीपट दाखवले जाणार आहेत.

****

संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्याखाली अटकेत असलेल्या वाल्मिक कराड याला काल बीडच्या विशेष न्यायालयानं येत्या बावीस तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. काल झालेल्या सुनावणीबद्दल जिल्हा सरकारी वकील बाळासाहेब कोल्हे यांनी अधिक माहिती दिली..

***''या न्यायालयापुढे आमचं पहिलं म्हणणं असं होतं, मूळ कलम ३०२ आहे. त्या कटात यांचा सहभाग आहे. त्याच्यावर आम्हाला तपास करायचा आहे. कट केव्हा केला? कुठं केला? कशा पद्धतीनं कट राबवण्यात आला? हा एक भाग. आणि दुसरं म्हणजे मोकाच्या अंतर्गत प्रॉपर्टीचे ॲसेटस् त्याची पूर्ण डिटेल्स चौकशी करणे आहे. या दोन्ही ग्राऊंडस्वर आरगुमेंट केल्यानंतर कोर्टाने २२ तारखेपर्यंत पी सी आर दिलेला आहे.''***

सुरक्षेच्या कारणामुळे कराडविरुद्धचा खटला बीड इथल्या न्यायालयात वर्ग केल्यानंतर पोलिसांनी काल कराड याला केजहून बीडला आणलं आहे. सुनावणी झाल्यावर कराड याला न्यायालयाबाहेर नेताना त्यांचे समर्थक आणि विरोधक मोठ्या संख्येनं जमा झाले होते, परिस्थितीवर नियंत्रणासाठी पोलिसांना बळाचा वापर करावा लागल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी पक्षाची बीड जिल्हा कार्यकारणी बरखास्त केली आहे. यापुढे तालुका अध्यक्ष आणि जिल्हाध्यक्ष यांच्या चारित्र्याची पडताळणी करूनच नेमणुका कराव्या अशा सूचना बीड राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांना देण्यात आल्या आहेत. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातले आरोपी विष्णू चाटे तसंच वाल्मिक कराड यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी थेट संबंध असल्याच्या पार्श्वभूमीवर या पक्षानं हा निर्णय घेतला आहे.

****

महिला क्रिकेट मध्ये राजकोट इथल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारताने आयर्लंडचा ३०४ धावांनी पराभव केला. यासोबतच भारतीय महिलांनी तीन सामन्यांची मालिका तीन – शून्य अशी जिंकली. काल झालेल्या सामन्यात भारतीय महिलांनी प्रथम फलंदाजी करत ४३५ अशी मोठी धावसंख्या उभी केली. प्रतिका रावलनं १५४ तर कर्णधार स्मृती मंधानानं १३५ धावा केल्या. या आव्हानाचा पाठलाग करताना आयर्लंडचा डाव बत्तीसाव्या षटकांत अवघ्या १३१ धावांत संपुष्टात आला. भारताकडून दिप्ती शर्मानं तीन तर तनुजा कंवरनं दोन बळी घेतले.

****

खो–खो विश्वचषक स्पर्धेत भारतीय पुरुष आणि महिला संघांनी विजयी घोडदौड सुरु ठेवत उपान्त्य पूर्व फेरीत प्रवेश केला आहे. भारतीय पुरुष संघानं काल पेरु संघाचा ७०– ३८ असा, तर महिला संघानं इराणचा १०० – १६ अशा मोठ्या गुण फरकाने पराभव केला.

****

एकोणवीस वर्ष मुले मुली गटातील राष्ट्रीय शालेय बेसबॉल क्रीडा स्पर्धेचं काल नांदेड इथं शानदार सोहळ्यात उद्घाटन झालं. देशभरातून आलेल्या सर्व राज्याच्या संघानी आपापल्या राज्याच्या झेंडा फडकवत संचलन केलं, त्यानंतर मान्यवरांच्याहस्ते ध्वजारोहण तसंच दीप प्रज्वजलन करुन स्पर्धेला सुरुवात करण्यात आली.

****

उदगीर शहरात कावळ्यांच्या अनपेक्षित मृत्यूच्या घटनेची तातडीने दखल घेत मृत कावळ्यांचे वैद्यकीय नमुने औंध येथील राज्यस्तरीय पशुरोग निदान प्रयोगशाळेकडे

पाठवण्यात आले आहेत. याबाबतचा वैद्यकीय तपासणी अहवाल प्राप्त होताच पुढील आवश्यक कार्यवाही केली जाणार आहे. या अनुषंगाने उपाययोजना करण्यासाठी जिल्हास्तरावर शीघ्र कृती दल स्थापन करण्यात आलं आहे. तसंच जिल्हा नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे.

****